भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०४/२०१७

## १) टाटा एस.चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोसा.ला धडक मारून दोन ईसम गंभीर जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दि.१६/०४/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील जखमी प्रेमराज उर्फ प्रेमनाथ पिसाराम येळणे वय ४६ वर्ष, हा त्याची पत्नी सौ. निर्मला येळणे वय ४० वर्ष दोन्ही रा. पिंडकेपार हिचे सोबत एन.एच. ०६ रोड नी सौंदड कडे आपले हिरो एच.एफ. डिलक्स मो.सा. क्र. एमएच. ३६ व्ही ८३६९ नी डब्बलसीट जात असता वीरसी गावाकडुन येणाऱ्या आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील टाटा एस. गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे व धोकादायक रित्या चालवुन रोड ओलांडत असतांना जखमीचे मो.सा. ला धडक मारून मोटारसायकल चालक व त्याची पत्नी यांना गंभीर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी ऋषी तुलाराम येळणे वय ४५ वर्ष रा. पिंडकेपार यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

## २) संगनमत करून डुप्लीकेट चाबीने घराचा ताला खोलुन बेडरूम मधील गोदरेज कपाटातील सोन्याचांदीच्या दागीन्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १६/०४/२०१७ चे ०२.३० वा. दरम्यान यातील अनोळखी आरोपी ईसमानी संगनमत करून चेहऱ्यावर स्कॉर्प बांधुन फिर्यादीचे घराचे पहील्या रूमच्या दाराला लावलेला ताला डुप्लीकेट चाबीने खोलुन आत प्रवेश करून फिर्यादीचे तोंड दाबुन बेडरूममध्ये पलंगावर झोपवुन पलंगाजवळ असलेला गोदरज कपाट व आतमधिल लॉकर तोडुन लॉकर मध्ये ठेवलेले ८३ ग्रॅम सोन्याचे जुने वापरलेले दागीने किंमती २,०७,५००/रू.व २००ग्रॅम जुने वापलेले चांदीचे दागीने किंमती १०,०००/रू. असा एकुन २,१७,५००/रू. (दोन लाख सतरा हजार पाचशे रू.)चे सोन्या चांदीचे दागीने चोरून नेल्याने फिर्यादी सौ. रेखा लक्ष्मन जोशी वय ४८ वर्ष रा. पंचशील वार्ड दुर्गा चौक साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३९४,४५८,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

## ३)मंदीरातील स्टोर रूमचा ताला तोडुन धान्य व लॉऊड स्पीकर साहीत्य चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०४/२०१७ चे १०.०० ते दि. १६/०४/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान महालगाव येथील संतोषीमाता मंदीर व हरीहर बाबा मंदीराचे कोणीतरी अज्ञात चोराने सामान ठेवण्याचे स्टोर रूमचा ताला तोडुन आत प्रवेश करून त्यात ठेवलेले ५० किलो वजनाचे दोन तांदळाचे कट्टे, ६० किलो तुळ व लाखोरी दाळ मिश्रीत कट्टा, १ लाऊड स्पीकर मशीन, कॅशेट वाजवीन्याचे व्हिडीओ प्लेअर असा एकुन १०,५००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी भारत नागोरावजी शेंडे वय ७९ वर्ष रा. महालगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४६१.३८० भादंवि.

**४) जुने वादावरून संगनमत करून भांडन शिवीगाळ, बासाचे काठीने डोक्यावर मारून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०४/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे संख्ये नातेवाईक असुन त्यांचे शेतातील झाडाचे पैशाचे वाटनी वरून वाद आहे. यातील फिर्यादीने शेतातील झाडे विकल्याने आपल्या हिस्याचे पैसे मागण्याकरिता आरोपी क्र.१ याचे कडे गेला असता त्याने कशाचे पैसे, पैसे देत नाही असे म्हणुन भांडन करून थापडबुक्यांनी व बासाचे काठीने डोक्यावर, उजव्या खांदयावर मारून जखमी केले व आरोपी क्र.२ यांनी शिवीगाळ करून थापड बुक्यांनी मारून मारण्यापिठण्याची धमकी दिल्याने फिर्यादी तुकाराम सहादेव रेहपाडे वय ५८ वर्ष रा. चितापुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) ट्रकचालकाच्या निष्काळजीपणामुळे ट्रकला मागेहुन धडक मारून चालकास जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दि. १६/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा ट्रक क्र. एमएच. ३६ /६२०२ ने मिरेगाव जटेश्वर रेतीघाटाकडे रेती आनण्याकरिता जात असता मुंडीपार येथे भेल कंपनी समोर एनएच. ०६ रोडवर मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन तसेच कोणत्याही प्रकारची खबरदारी न घेता ट्रक ला मागेहुन धडक देवुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. उईके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि.सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक १६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवाहरनगर, मोहाडी येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५५ लिटर हा. भ. दारू + ९०० किलो सडवा साहीत्य किंमती ४५,०५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.




17.4.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

समक्ष
पोउपनि. तुळनेपार
पोनि कक्ष, भंडारा

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.